जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-28

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

वरुड | सोमवार

०६.०४.२०२६

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १० | पृष्ठे: ०४ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712


## थोडक्यात

### व्याजदर यंदा स्थिरच? आजपासून पतधोरण समितीची आढावा बैठक : बुधवारी निर्णय जाहीर होणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)


**मुंबई** – पश्चिम आशियातील संकटामुळे महागाई वाढण्याची शक्यता असल्याने, भारतीय रिझर्व्ह बँक एप्रिलमधील पतधोरण आढावा बैठकीत मुख्य 'रेपो रेट' ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवण्याची शक्यता असल्याचे अर्थतज्ज्ञांनी म्हटले आहे.

सहा सदस्यीय पतधोरण समितीची एप्रिलमधील आढावा बैठक सोमवारी सुरू होणार असून, बुधवारी अंतिम निर्णय जाहीर होणार आहे. पश्चिम आशियातील सततचा भू-राजकीय तणाव, वस्तूंच्या किमतींमधील चढ-उतार आणि रुपयाच्या मूल्यात झालेली मोठी घसरण यामुळे धोरणात्मक निर्णय घेणे कठीण झाले आहे.

# मोदींनी गॅसचे संकट कोरोनासारखं हाताळण्याचे वचन दिलं आणि त्यांनी तेच करुन दाखवलं, प्रत्येक संकटात सर्वात आधी गरीबच का मरतात?

## राहुल गांधींचा जोरदार प्रहार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – राहुल गांधी देशातील घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या तुटवड्यावरून मोदींवर ट्विट करत हल्लाबोल केला आहे. मोदी म्हणाले होते की ते एलपीजी गॅसचे संकट कोविडप्रमाणे हाताळतील आणि त्यांनी नेमके तेच केले.

जेव्हा अहंकारच धोरण बनतो तेव्हा अर्थव्यवस्था कोसळते, कामगार पलायन करतात, उद्योगधंदे उद्ध्वस्त होतात आणि देश अनेक दशके मागे जातो, अशा शब्दात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पीएम मोदी यांच्यावर तोफ डागली आहे.

राहुल गांधी देशातील घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या तुटवड्यावरून मोदींवर ट्विट करत हल्लाबोल केला आहे. मोदी म्हणाले होते की ते एलपीजी गॅसचे संकट कोविडप्रमाणे हाताळतील आणि त्यांनी नेमके तेच केले, असा टोला लगावला आहे.

मजुरांसाठी गॅस परवडण्याजोगा राहिला नाही राहुल गांधी यांनी ट्विटमध्ये म्हटलं आहे की, अगदी कोविडप्रमाणेच कोणतेही धोरण नाही, मोठ्या घोषणा आणि गरिबांवर बोजा होत आहे.

ते पुढे म्हणाले की, दिवसाला ५००-८०० रुपये कमावणाऱ्या स्थलांतरित मजुरांसाठी एलपीजी गॅस आता परवडण्याजोगा राहिलेला नाही. रात्री घरी परतणाऱ्या मजुरांकडे चूल पेटवण्यासाठीसुद्धा पैसे नसतात. याचा परिणाम: ते शहरे सोडून गावांमध्ये पलायन करतात. कापड गिरण्या आणि कारखान्यांचा कणा असलेले मजूरच आज उद्ध्वस्त होत आहेत.

सर्वात आधी गरीबच का मरतात? त्यांनी पुढे म्हटलं आहे की, कापड क्षेत्र आधीच आयसीयूमध्ये आहे. उत्पादन कोसळत आहे आणि हे संकट आले कुठून?

राजनैतिक स्तरावर झालेली एक चूक, जी सरकार अजूनही मान्य करायला तयार नाही. त्यामुळे प्रश्न उरतोच, प्रत्येक संकटात सर्वात आधी गरीबच का मरतात? गप्प बसू नका. हा केवळ गरिबांचा प्रश्न नाही, तर हा आपल्या सर्वांचा प्रश्न आहे.

# बारामतीची पोटनिवडणूक झाली तर...

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आज बारामती पोटनिवडणुकीचा उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यापूर्वी बारामतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचा मेळावा पार पडला.

ही पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी महायुतीकडून प्रयत्न करण्यात आले होते. मात्र, काँग्रेसने ही निवडणूक लढवण्याचा ठाम निर्णय घेतला असून, त्यांच्या कडून आकाश मोरे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रवादीच्या मेळाव्यातील भाषणातून विरोधकांना सूचक इशारा दिला.

एकनाथ शिंदे म्हणाले की, बारामतीच्या पोटनिवडणुकीसाठी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा उमेदवारी अर्ज आपण भरत आहोत. ही पोटनिवडणूक आपल्याला दुर्दैवाने लढवावी लागत आहे. अजितदादांच्या दुर्घटनेनंतर संपूर्ण राज्य शोक सागरात बुडाला.

## राष्ट्रवादीच्या मेळाव्यातून एकनाथ शिंदेचा विरोधकांना सूचक इशारा



अजितदादांनी अनेक विभागातील खात्यांची जबाबदारी सांभाळली. अर्थ खात्याची देखील उत्तम प्रकारे त्यांनी जबाबदारी सांभाळली. एक उत्तम प्रशासक, उत्तम संघटक म्हणून त्यांनी काम केले. आम्ही अनेक वर्ष एकत्र काम केले. मी मुख्यमंत्री असताना लाडकी बहीण योजना करण्याचा आम्ही निर्णय घेतला. आवाका मोठा होता, व्याप्ती मोठी होती आणि त्याला लागणारा वार्षिक खर्च देखील फार मोठा होता. परंतु, अशा परिस्थितीत देवेंद्र फडणवीस, मी आणि अजितदादांनी ठरवले. अजितदादांनी कुठलीही घडी विस्कटू न देता अतिशय उत्तमपणे ही योजना राबवण्याचा निर्णय घेतला. अर्थ खात्याची जाण असणारा नेता म्हणून मी त्यावेळी अजितदादांना बघितले.

जनता सुनेत्राताईंच्या पाठीशी अजितदादांच्या जाण्याने एक मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. परंतु, सुनेत्रा ताईनी देखील उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी अतिशय समर्थपणे स्वीकारली आहे.

# अकोल्यात 'धुरंधर' स्टाईल गुंडगिरी : एकमेकांवर सपासप वार

## पोलिसांनी काढली धिंड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**अकोला** – शहरातील कौलखेड परिसरात 'धुरंधर' चित्रपट बघून गुंडगिरी करणाऱ्या पाच तरुणांना पोलिसांनी अवघ्या २४ तासांत बेड्या ठोकल्या आहेत. श्रद्धा नगर भागात भरदिवसा तीन जणांवर प्राणघातक हल्ला केल्यानंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, तातडीने कारवाई करत पोलिसांनी आरोपींची धिंड काढत त्यांच्या दहशतीला लगाम घातला आहे.

धारदार शस्त्रांनी तिघांवर हल्ला ५ एप्रिल रोजी दुपारी कौलखेड परिसरात पाच जणांनी धारदार शस्त्रांनी तीन युवकांवर हल्ला केला. या हल्ल्यात अभिलाष हिंगे, रविकिरण उर्फ छोटू ठाकरे आणि हरी ओम रोठे हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर सध्या खासगी आणि शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

चित्रपट पाहून नशेत धिंगाणा प्राथमिक तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपींनी धुरंधर २ हा चित्रपट पाहिल्यानंतर नशेत परिसरात धिंगाणा घातला. स्वतःला 'धुरंधर' समजत त्यांनी नागरिकांवर हल्ला करत दहशत निर्माण केली. या संपूर्ण घटनेचे थरारक दृश्य सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले होते.

### अमेरिकेहून परतल्यावर ४८ तासांतच काळाचा घाला

# उच्चशिक्षित तरुण कार अपघातात ठार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – शिक्षणासाठी अमेरिकेला गेलेला तरुण दोन वर्षांनंतर मायदेशी परतला, घरात आनंदाचे वातावरण होते.

मात्र, काळाने नियतीचा असा खेळ मांडला की, घरी परतल्याच्या अवघ्या ४८ तासांतच या उच्चशिक्षित तरुणाचा भीषण कार अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. नाशिक-गिरणारे रस्त्यावरील 'गंमतजमंत' हॉटेलजवळील पुलावर हा अपघात घडला. शंतनू जयंत बुऱ्हाडे (२४,रा. दीपज्योती, धनराजनगर, जेलरोड) असे मृताचे नाव आहे. या अपघातात शंतनूचे दोन मित्रही गंभीर जखमी झाले असून, त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. शंतनू उच्चशिक्षणासाठी अमेरिकेत वास्तव्यास होता. दोन दिवसांपूर्वीच तो नाशिकमध्ये आपल्या घरी परतला होता. शनिवारी (दि.४) दुपारी ४ वाजेच्या सुमारास तो आपल्या दोन मित्रांसह कारने गंगापूर बॅकवॉटर आणि धरण परिसर फिरण्यासाठी गेला होता.

निसर्गाचा आनंद घेऊन रात्री साडेआठच्या सुमारास गिरणारेकडून नाशिककडे परतत असताना, गोदावरी नदीच्या पुलाजवळ असलेल्या 'गंमतजमंत' हॉटेललगत शंतनूचे कारवरील नियंत्रण सुटले.

# नागपूरच्या अथर्व ननोरे अपहरण अन हत्याकांडचा ७२ तासानंतर अखेर उलगडा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागपूर** – शहरात खळबळ उडवणाऱ्या १४ वर्षीय अथर्व ननोरेची पहरण आणि हत्याकांड प्रकरणाचा अखेर तीन दिवसानंतर उलगडा झाला आहे. हनुमान जयंतीनिमित्त गिट्टीखदान येथे निघालेल्या शोभायात्रेतून अथर्व बेपत्ता झाला होता. त्यांनतर नागपूर पोलिसांनी तपासाचे चक्र गतिमान करत अखेर तीन दिवसांनंतर अथर्व ननोरेची अपहरण करून हत्याकांड प्रकरणाचा उलघडा केला आहे. नागपूर पोलिसांच्या क्राईम ब्रांचने या प्रकरणी तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. धक्कादायक बाब म्हणजे शेजारी राहणाऱ्या जय यादव आणि त्याचे मित्र कृणाल शाहू आणि आशिष शाहू यांनी पैशासाठी अपहरण करून हत्या केल्याचे कबूल केले आहे.

### एअरटेल टॉवरमधील बॅटरी चोरणाऱ्या

# अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – एअरटेल टॉवरची बॅटरी डाऊन झाल्याने पाहणी केली असता, टॉवरच्या कॅबीनचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने दोन महागड्या बॅटरी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे.

घटनेचा सविस्तर तपशील मिळालेल्या माहितीनुसार, मौजा जामठी गणेशपूर येथील शामराव बांद्रे यांच्या शेतात एअरटेल व्ही.आय. कंपनीचा मोबाईल टॉवर (आयडी १०९३३४१८) आहे. १० मार्च च्या सायंकाळच्या सुमारास टॉवरची बॅटरी डाऊन झाल्याचा संदेश मिळाल्याने कंपनीच्या वतीने पाहणी करण्यात आली. यावेळी टॉवरमधील 'एसीकॉम' कंपनीच्या बॅटरी बँक कॅबीनचे लॉकर अज्ञात व्यक्तीने तोडल्याचे दिसून आले. चोरट्याने कॅबीनमधून दोन नग सेल बॅटरी (अनुक्रमे सिरीयल नंबर ७७०००४११०० आणि ७७०००४३१५७) लंपास केल्या. या चोरीला गेलेल्या मुद्देमालाची अंदाजे किंमत १६ हजार रुपये असल्याचे सांगितले जात आहे. पोलिसात तक्रार दाखल या प्रकरणी फिर्यादी शुभम रामचंद्र तायडे (वय २६) रा.अमरावती यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली. शुभम तायडे हे एका खाजगी कंपनीत नोकरीला असून त्यांनी दिलेल्या जबानी रिपोर्टवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.




# काटोल-वरूड-मोर्शी-पुणे नवीन रेल्वे व मेट्रो सुरु करा

## आ.यावलकर व आ.ठाकुर यांची केंद्रीय रेल्वेमंत्र्याशी चर्चा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरूड** – मोर्शीचे आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर आणि काटोलचे आमदार चरणसिंग ठाकूर यांनी इतर मान्यवरांसह नवी दिल्लीत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी दोन्ही मतदारसंघातील रेल्वेसंबंधित समस्यांवर प्रकाश टाकला. दोन्ही आमदारांनी मांडलेल्या मागण्यांना वैष्णव यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. यावलकर यांनी काटोल, नरखेड, वरुड, मोर्शी, बडनेरा, पुणे या मार्गावर रेल्वे सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव सादर केला. या भागातील रहिवाशांना सध्या पुणे रेल्वे मार्गाशी थेट जोडणी नसल्यामुळे, प्रवाशांना प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वैष्णव यांनी आमदार यावलकर यांना ही मागणी लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्याचप्रमाणे ठाकूर यांनीही प्रस्ताव सादर केला. प्रवाशांची सोय, सुरक्षितता आणि वेग सुधारण्याच्या उद्देशाने तातडीच्या मागण्यांकरिता चर्चेदरम्यान त्यांनी वैष्णव यांना विनंती केली, दक्षिण एक्सप्रेसचे पूर्वीप्रमाणेच काटोल आणि नरखेड येथील थांबे पुन्हा पुर्वरत सुरु करावेत व इतर मागण्यांमध्ये भुसावळ, नरखेड नियमित सेवेचे सातत्य राखणे आणि विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी, सर्वेक्षणानंतर एका नवीन पुलाचे बांधकाम



करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. नागपूर, काटोल, नरखेड रेल्वे मार्गावर 'मेट्रो' सेवा सुरु करण्याबाबतही या चर्चेदरम्यान विचारविनिमय करण्यात आला. या याव्यतिरिक्त, वर्धा, काटोल, नरखेड मार्गासाठी नवीन जोड रेल्वे मार्ग उभारण्या बाबतचे प्रस्तावही सादर करण्यात आले. वैष्णव यांनी या सर्व प्रस्तावांना सकारात्मक प्रतिसाद दिला. आणि त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही केली जाईल असे आश्वासन दिले. दिल्ली, नागपूर मार्गावरील ढवळापुर येथील जुन्या दगडी पुलाच्या जागी आधुनिक 'बॉक्स ब्रिज' उभारण्याची आवश्यकताही यावेळी अधोरेखित करण्यात आली. दोन्ही आमदार आपापल्या मतदारसंघातील नागरिकांना अधिक दर्जेदार, सुरक्षित आणि सुलभ रेल्वे सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे दिसून आले.

# तुमचे एक मत हीच अजितदादांना खरी श्रद्धांजली

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**बारामती** – गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात चर्चेत असलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीला बिनविरोध करण्याचे प्रयत्न अखेर अपयशी ठरले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी स्वतः बारामती पोटनिवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. महायुतीकडून ही निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी सुरुवातीपासून प्रयत्न करण्यात आले होते. त्याच पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना दूरध्वनीद्वारे पाठिंब्याची विनंती केली होती. मात्र, या प्रयत्नांना यश आले नाही. काँग्रेसने रविवारी दिल्लीतून बारामती पोटनिवडणुकीसाठी आपल्या उमेदवाराची घोषणा केली. काँग्रेसकडून आकाश मोरे यांना सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवारी देण्यात आली आहे. आज सुनेत्रा पवार आणि आकाश मोरे हे दोघेही आपापले उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

# अध्यात्मिक आघाडी प्रमुख पद व पक्ष सदस्यत्वाचा डॉ.शंतनू रसे महाराज यांचा राजीनामा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरूड** – भारतीय जनता पार्टीचे मोर्शी विधानसभा अध्यात्मिक आघाडी प्रमुख ह.भ.प.डॉ.शंतनू महाराज रसे यांनी आपल्या पदाचा तसेच पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. वैयक्तिक कारणास्तव पदाच्या जबाबदाऱ्यांना योग्य न्याय देता येत नसल्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी कळिवले आहे.

राजीनामा देताना त्यांनी आपले व्यक्तव्य मांडताना सांगितले की, 'माझी कसलीही नाराजी नाही. नाराजी मानणाऱ्या मधले माझे व्यक्तिमत्व नाही. मी अखंड आनंदी माणूस आहे. मात्र मला संपुर्ण अध्यात्मिक आणि हिंदुत्वाचे कार्य करायचे आहे. राजकीय पक्षामध्ये कार्य करत असताना वैचारिक रित्या व्यक्त होण्यासाठी आणि अखंड हिंदुत्व व अध्यात्माचे कार्य करण्यासाठी काही बंधने येतात, त्यामुळे हा निर्णय घेतला आहे.

तसेच त्यांनी पुढे नमूद केले की, माझी निष्ठा ही आमदार चंदु यावलकर यांच्याशी जोडलेली आहे आणि ती पुढेही अखंड तशीच राहील.

राजीनामा दिल्यानंतरही हिंदुत्वाच्या विचारधारेप्रती आपली निष्ठा कायम राहील व सामाजिक, अध्यात्मिक कार्य अधिक व्यापक पद्धतीने सरु ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# प्रतिभा बुरंगे यांचे निधन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरूड** – शहरातील जिजाऊ नगर परिसरातील रहिवाशी तथा सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी ज्ञानेश्वर उर्फ बंडुपंत बुरंगे यांच्या अर्ध्यांगिणी प्रतिभा बुरंगे यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने आज सकाळच्या सुमारास निधन झाले.

आज पहाटेच्या सुमारास अत्यवस्थ वाटु लागल्याने त्यांना शहरातील हृदयरोग तज्ञ डॉ.राम गोधने यांच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. सकाळच्या सुमारास त्यांनी औषधोपचाराला उत्तम प्रतिसाद दिला मात्र सकाळी ११.१५ च्या सुमारास त्यांना पुन्हा हृदयविकाराचा तिव्र झटका आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच अनेकांनी त्यांच्या निवासस्थानी जावुन अंत्यदर्शन घेतले. उद्या रविवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर शहरातील केदारेश्वर मोक्षधाम येथे करण्यात येणार आहे.

त्यांच्या मागे पती ज्ञानेश्वरराव, गौरव आणि विवेक अशी २ मुले, सुना, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने जिजाऊ नगर परिसरातील शोक व्यक्त केल्या जात आहे.

# लोकसभेत खासदारांची संख्या ५४३ वरुन ८१६ होणार? महाराष्ट्राच्या वाट्याला ७२ खासदार, विधानसभेचंही चित्र बदलणार?

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**नवी दिल्ली** – लोकसभेत ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्यासंदर्भात होणाऱ्या विशेष अधिवेशनात घटना दुरुस्ती विधेयक मांडण्यात येणार असून महिला आरक्षण विधेयक मंजूर करण्यासाठी संसदेचे चालू अर्थसंकल्पीय अधिवेशन वाढवण्यात आले आहे. परिणामी, पुढील आठवड्यात होणाऱ्या विशेष अधिवेशनात घटना



दुरुस्ती विधेयक मांडण्यात येणार असून लोकसभा आणि राज्यसभेचे पुढील अधिवेशन १६ एप्रिल रोजी होणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही सभागृहे १६ ते १८ एप्रिल दरम्यान तीन दिवस कामकाज करण्याची शक्यता आहे. पूर्वीच्या नियोजनानुसार, अर्थसंकल्पीय अधिवेशन गुरुवारी संपणार होते. सूत्रांनी असेही सूचित केले आहे की, सरकार चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पुढील तीन दिवसांत महिला आरक्षणाशी संबंधित 'नारी शक्ती वंदन कायद्या'त सुधारणा करणारे विधेयक सादर करू शकते, ज्यामुळे लोकसभेतील जागांची संख्याही वाढेल.

राज्यातील खासदारांचे संख्याबळ ४८ वरून ७२ पर्यंत जाईल? अशातच, राज्यातील खासदारांचे संख्याबळ ४८ वरून ७२ पर्यंत जाईल, असा अंदाज आहे. असं झाल्यास यातून राज्यातील खासदारांची संख्या २४ ने वाढणार आहे. तसेच विधानसभेचे संख्याबळ ४०० पेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे. महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण लागू झाल्यावर २७३ जागा महिलांसाठी राखीव होतील. तेवढ्या जागांचे संख्याबळ वाढविण्याची मोदी सरकारची योजना आहे.

दोन आठवड्यांपूर्वी गृहमंत्री अमित शहा यांनी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करीत सहमती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. तेव्हाच लोकसभेचे संख्याबळ ८१६ होईल, असे सूचित करण्यात आले होते.

### पुसल्याला अवकाळीचा तडाखा

# गणेश चौधरी यांच्या घरावरील छप्पर उडाले, संसाराची मोठी वाताहत

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**वरूड** – तालुक्यातील पुसला परिसरात काल झालेल्या जोरदार अवकाळी पावसाने आणि सोसाट्याच्या वाऱ्याने नागरिकांची चांगलीच दाणादाण उडाली. या नैसर्गिक आपत्तीचा सर्वाधिक फटका येथील रहिवासी गणेश चौधरी यांच्या कुटुंबाला बसला असून वाऱ्याच्या तीव्र वेगामुळे त्यांच्या घरावरील संपूर्ण छप्पर उडून गेले आहे.

नेमकी घटना काय?

काल सायंकाळच्या सुमारास अचानक वातावरणात बदल झाला आणि विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. पावसासोबतच आलेल्या वादळी वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की, गणेश चौधरी यांच्या घरावरील पत्रे कागदासारखे हवेत उडाले. छप्पर उडाल्यामुळे घरातील सर्व साहित्य, धान्य आणि कपडे पावसात भिजून मोठे नुकसान झाले आहे.

कुटुंबावर आभाळ फाटलं

घटनेच्या वेळी कुटुंबातील सदस्य घरातच होते, मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. 'अचानक आलेल्या वादळाने आमचे छत्र हिरावून नेले, आता राहायचे कुठे आणि खायचे काय?' असा टाहो चौधरी कुटुंबाने फोडला आहे. घराचे नुकसान झाल्याने हे कुटुंब आता उघड्यावर आले असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

या अवकाळी पावसामुळे केवळ घरांचेच नव्हे तर शेती पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. महसुल विभागाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन गणेश चौधरी यांच्या घराचा पंचनामा करावा आणि त्यांना शासनाकडून त्वरित आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी पुसला येथील ग्रामस्थांनी केली आहे.

### तालुक्यात अवकाळीचा हाहा:कार

# पुसला, उराड, जामठीसह अनेक गावांत पिकांचे प्रचंड नुकसान

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – काल झालेल्या अचानक आणि जोरदार अवकाळी पावसामुळे वरुड तालुक्यातील ग्रामीण भागाला मोठा तडाखा बसला आहे. विशेषतः पुसला, पंढरी, उराड, लिंगा, जामठी, गणेशपूर, सावंगी, पिपलागड, कारली, जामगाव आणि एकलविहीर या गावांमध्ये निसर्गाच्या कोपाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावून घेतला आहे.



गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना पावसाने दिलासा दिला असला, तरी शेतकऱ्यांसाठी हा पाऊस आस्मानी संकट ठरला आहे. या भागातील मुख्य पिके असलेल्या संत्रा, मोसंबीसह रब्बी हंगामातील काढणीला आलेल्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.

संत्रा बागांना फटका: जोरदार वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे संत्रा फळांची मोठ्या प्रमाणावर गळती झाली आहे. काढणीला आलेली पिके शेतात कापून ठेवलेला माल भिजल्याने आणि पिकांच्या पडझडीमुळे उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पायाभूत सुविधांचे नुकसान अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली असून काही घरांवरील छप्परे उडाल्याच्याही घटना समोर आल्या आहेत.

शेतकरी हवालदिल 'वर्षाच्या मेहनतीवर एका तासाच्या पावसाने पाणी फेरले,' अशी भावना येथील हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. आधीच आर्थिक संकटात असलेल्या बळीराजासमोर आता पुढील उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. तातडीने पंचनाम्यांची मागणी या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे शासनाने तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत आणि बाधित शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई जाहीर करावी, अशी आर्त हाक पुसला आणि परिसरातील गावकऱ्यांनी प्रशासनाकडे दिली आहे.



**पुसला परिसरात अवकाळी पावसामुळे नुकसान; तातडीच्या मदतीची मागणी**

"पुसला परिसरात नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पावसामुळे उभ्या पिकांचे नुकसान होऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. विशेषतः गहू, हरभरा आणि भाजीपाला पिकांना मोठा फटका बसल्याचे दिसून येत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे त्वरीत करून त्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, तसेच पिक विमा योजनेंतर्गतही योग्य भरपाई मिळावी, तसेच, प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानाचे अचूक मूल्यांकन करावे आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी या सामाजिक कार्यकर्ते इंद्रभूषण सोंडे यांनी शासनाकडे केली आहे.

# संपादकीय

**चला आपले आज आपण येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्या साठी त्याग करू.**

## विकास की विनाशाची वाट? हरवलेल्या मानवी मूल्यांचा शोध

आज आपण अशा एका वळणावर उभे आहोत, जिथे प्रगतीचा अर्थ फक्त आकड्यांमध्ये मोजला जात आहे. सिमेंटची जंगले, वेगवान महामार्ग आणि हातातील अत्याधुनिक गॅजेट्स म्हणजे विकास, अशी एक चुकीची व्याख्या समाजात रुजली आहे. परंतु, या तथाकथित विकासाच्या नावाखाली आपण एका अशा व्यवस्थेचे वाहक बनलो आहोत, जी मानवी श्रमाला आणि पवित्र भावभावनांना चक्क 'पैशाच्या तराजूत' तोलत आहे. ही 'दिखाऊ-बाजारू' व्यवस्था मानवी संवेदनांचा गळा घोटत असून, भारतीय समाजाला एका अशा अनिश्चिततेच्या गर्तेत ढकलत आहे, जिथे आपली अवस्था 'पत्ता हरवलेल्या अमेरिकेसारखी' व्हायला फार काळ लागणार नाही. बाजारूपणाचे आक्रमण आणि संवेदनाशून्य समाज आजच्या काळात 'मूल्य' या शब्दाचा अर्थ बदलून तो फक्त 'किंमत' यापुरता मर्यादित झाला आहे. जेव्हा एखादी व्यवस्था मानवी श्रमाला केवळ एक 'उत्पादनाचे साधन' मानते, तेव्हा त्या श्रमामागील घाम, कष्ट आणि स्वाभिमान दुर्लक्षित होतो. कॉर्पोरेट जगतापासून ते घरातील कामांपर्यंत, प्रत्येक गोष्टीची तुलना पैशात होऊ लागली आहे.

नातेसंबंधांमध्येही आता 'गुंतवणूक' आणि 'परतावा' शोधला जात आहे. जर एखाद्या नात्यातून किंवा भावनेतून आर्थिक फायदा होत नसेल, तर ती निरुपयोगी ठरवली जात आहे.

हा बाजारूपणा केवळ आर्थिक स्तरावर थांबलेला नाही, तर तो आपल्या मानसिकतेत शिरला आहे. एखाद्याचा सन्मान त्याच्या कर्तृत्वापेक्षा त्याच्या बँक बॅलन्सवरून ठरवला जात आहे. जेव्हा समाज भावभावनांना बाजारात मांडतो, तेव्हा माणुसकीचा पाया डळमळीत होतो. विकासाचा आभास आणि वास्तव आपण ज्याला विकास म्हणतो, तो खरोखर सर्वांगीण आहे का?

टोलेजंग इमारतींच्या सावलीत जेव्हा एखादा कामगार आपल्या मुलाच्या भुकेसाठी व्याकुळ होतो, तेव्हा त्या विकासाला 'दिखाऊ' म्हणण्याशिवाय पर्याय उरत नाही. निसर्गाचा नाश करून उभी राहिलेली शहरे आणि मानसिक शांतता गमावून मिळवलेली संपत्ती म्हणजे विकास नव्हे. आपण अशा व्यवस्थेचे भाग बनलो आहोत जिथे 'दिखावा' हा 'असण्यापेक्षा' मोठा झाला आहे. सोशल मीडियावरील आभासी जग आणि तिथे मिळणारे 'लाईक्स' हेच आता आनंदाचे प्रमाण बनले आहे. ही 'बाजारू संस्कृती' आपल्याला आतून पोखरत आहे.

भारतीय समाजाची पाश्चात्यकरणाकडे धाव अमेरिकेसारख्या विकसित देशांचे उदाहरण घेताना आपण अनेकदा त्यांच्या तांत्रिक प्रगतीचे कौतुक करतो. पण त्याच अमेरिकेने आपली सांस्कृतिक मुळे आणि कौटुंबिक वीण कधीच गमावली आहे. तिथला समाज प्रचंड भौतिक सुखात असूनही मानसिकदृष्ट्या एकटा आणि 'पत्ता हरवलेला' आहे. भारत आता त्याच वाटेवर वेगाने धावत आहे. भारतीय संस्कृतीचा मूळ आधार 'कुटुंब' आणि 'सहसंवेदना' हा होता. पण आज आपण पाश्चात्य जगाचे आंधळे अनुकरण करताना आपली हीच ताकद गमावत आहोत. विभक्त कुटुंब पद्धती, वृद्धाश्रमांची वाढती संख्या आणि तरुणांमधील वाढते नैराश्य ही चिन्हे आहेत की आपण आपला मार्ग चुकलो आहोत. आपण 'ग्लोबल' होण्याच्या नादात 'लोकल' मूल्ये विसरत चाललो आहोत. जर हीच परिस्थिती राहिली, तर भौतिक समृद्धी असूनही भारतीय समाज आपली ओळख हरवून बसेल. श्रमाचा अवमान आणि यंत्रवत जीवन ज्या समाजात कष्ट करणाऱ्या हातांना योग्य सन्मान मिळत नाही आणि फक्त बुद्धीचा व्यापार करणाऱ्यांना डोक्यावर घेतले जाते, तो समाज दीर्घकाळ टिकू शकत नाही. शेतकरी, कष्टकरी आणि कामगार यांच्या श्रमाला जेव्हा आपण पैशाच्या तराजूत कमी लेखतो, तेव्हा आपण अन्नाचा आणि कष्टाचा अपमान करतो. आजचा तरुण वर्ग शेती किंवा शारीरिक कष्टांपासून दूर पळत आहे, कारण समाजाने तसा 'मापदंड' सेट केला आहे. आपण माणसांना यंत्र बनवत आहोत आणि यंत्रांकडून माणसांसारखे वागण्याची अपेक्षा करत आहोत. वेळ अजूनही गेलेली नाही... जर आपल्याला 'पत्ता हरवलेली अमेरिका' बनायचे नसेल, तर आपल्याला पुन्हा एकदा आपल्या मुळांकडे वळावे लागेल. विकास असा हवा जो सर्वसमावेशक असेल, ज्यात केवळ खिसा नाही तर मनही समृद्ध होईल. मूल्यांची जोपासना: शिक्षणातून केवळ करिअर नव्हे, तर चारित्र्य घडवण्यावर भर दिला पाहिजे. श्रमाचा सन्मान: प्रत्येक कष्टाची किंमत पैशात न मोजता, त्याला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली पाहिजे.

सहसंवेदना: दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होण्याची वृत्ती पुन्हा जिवंत करावी लागेल. शेवटी, विकास म्हणजे केवळ जीडीपीचे आकडे नव्हेत. ज्या समाजात माणूस सुरक्षित आहे, जिथे भावनेला किंमत आहे आणि जिथे श्रमाला प्रतिष्ठा आहे, तोच समाज खऱ्या अर्थाने विकसित आहे. आपण या बाजारू व्यवस्थेचे केवळ 'वाहक' न बनता, तिचे 'टीकाकार' आणि 'सुधारक' बनले पाहिजे.

# संधी!! सुरक्षा!! सन्मान !!

२२ एप्रिल २०२५ ची सकाळ. काश्मीरमधील पुलवामा येथे अनेक पर्यटक पर्यटनांचा आनंद घेत होते. अचानक गोळ्या धडधड आवाज करत आतंकवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. ठरवून निवडून पुरुषांना यम सदनी पाठवले. नुकताच चार दिवसापूर्वी लग्न झालेलं एक तरुण जोडपं शिकार झालं. अनेकांचे संसार उध्वस्त झाले. बहुतांश महिलांचा कुंकू पुसल्या गेल. इस्लाम कबूल करो हम छोड देंगे असेही घडलं.

सुरक्षा यावर मोठे प्रश्नचिन्ह. सरकार अस्वस्थ झाल. अवघ्या पंधरा दिवसात या कानात त्या कानाला कळू नये इतकी दक्षता घेत सहा मे च्या मध्यरात्री दोन रणरागिणी दुर्गा आपल्या शक्तीनिशी आकाशात झेपावल्या. अवघ्या वीस मिनिटात शत्रूच्या ठिकाणी अचूक मारा करीत शत्रूला नामोहरम करीत या परतल्या. या संपूर्ण योजनेला कृतीला प्रत्येक थराला नाव दिले

**ऑपरेशन सिंदूर**

कोण होता या दुर्गा एक लेफ्टनंट कर्नल सोफिया कुरेशी २०१८ ची महिला अधिकारी तर दुसरी बिन कमांडर व्योमिका सिंग. २५०० तास हेलिकॉप्टरचा अनुभव गाठीशी असलेली अरुणाचल येथे चित्त चेतक या अभियानात ठसा उमटवलेली. या दोघींनी आपली निवड योग्य असल्याचे कृतीतून दाखवून दिले. सकाळी दोघींनी घेतलेली पत्र परिषद ऐकत असताना नकळत त्यांना सलाम केला. सार्थ अभिमान वाटला. आमची नारीशक्ती काय करू शकते हे जगाला दाखवून दिले. आमच्यावर सरकारने जबाबदारी दिली कर्तुत्वाला संधी दिली त्याचं सोनं करीत राष्ट्रीय सुरक्षेतील महत्त्वाचे योगदान या घटनेतून दिसून आलं आमचा सन्मान, गौरव हे यातून अधोरेखित झालं. ही भारताची ओळख आम्ही यानिमित्ताने जागवली .

अशीच काही दिवसांपूर्वीची घटना डोळ्या समोर आली. अवकाश क्षेत्रात अनेक क्षेपणास्त्र आपल्या देशातर्फे आज दाखल झालेली आहे. त्याची ओळख डॉक्टर कलामांनी पूर्वीच करून दिली. यालाच इस्त्रो असे म्हणतात. यात रात्रंदिवस अनेक महिला शास्त्रज्ञ डोळ्यात तेल घालून प्रयोगशाळेत काम करीत असतात. एका क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी झाली नाही म्हणून न डगमगता पुनश्च पदर खोचून या महिला शास्त्रज्ञांनी अहोरात्र मेहनत केली. जेव्हा चाचणी यशस्वी झाली तेव्हा त्याला नाव दिलं शिवशक्ती. याचा आनंद सोहळा दूरदर्शनवर दाखवत होते. शास्त्रज्ञ महिला साडी, कुंकू, गजरा अशा परिवेशात एकमेकींचं कौतुक करीत होत्या त्यांचे आनंदी चेहरे भारतीय संस्कृतीचा दर्शन घडवीत होत्या. माझी भूषा माझी ओळख अशा या सरस्वतीच्या आधुनिक लेकी.

पौराणिक काळात दर्शनशास्त्र अध्यात्म यात गार्गी मैत्री नावाज्ञात आहेत. पण सूर्या, सुलभा, लोपामुद्रा, घोषा, इंद्राणी अपला विश्व वारा अशा एक नव्हे २२ विदुषी काहींनी ऋग्वेदातील ऋचा देखील रचल्या आहेत. तर मंडन मिश्रा आणि शंकराचार्यांना न्याय देणारी भारती श्रीकृष्णा बरोबर लढाईत सामील होणारी जांबवती, ऋषिका याचबरोबर अरुंधती अहल्या अनुसूया या ऋषी पत्नी ही विदुषी आणि वंदनीय आहेत. ऐतिहासिक काळातील ताराबाई, झाशीची राणी, अहिल्यादेवी यांचा गौरव तर आम्ही करतोच ज्या देशात नदीला माता मानून तिचे खणा नारळ ओटी भरणारी आमची स्त्री तर आपल्या कुटुंबासाठी कार्तिकातील षष्ठीची पूजा समुद्र नदीकाठी करणारी स्त्री पतीसाठी आयुष्य मागणारी वटपौर्णिमेच्या व्रत करणारी महिला प्रत्येक सणात सूर्य, चंद्र, समुद्र, नदी, वृक्ष यांची पूजा करत त्यांची जपणूक करणारी आकाशाला वेद घालणारी असली तरी आमची पारंपारिक स्त्री महिला प्रत्येक उत्सवात उत्साहाने भाग घेत असते म्हणूनच आमची संस्कृती आजही टिकून आहे.

२१ व्या शतक उत्तर रोप्य महोत्सवी वर्षात येणारा हा महिला दिन ८ मार्च पन्नास वर्षांपूर्वी साजरा करण्याचे निश्चित केले आज त्याचा




उत्सव त्याचं रूप संमेलन, पार्टी, समारंभ यामध्ये केला जातो आहे. एक वेगळी बाब नमूद करावीशी वाटते कुटुंब व्यवस्था बघण्यासाठी काही महिलांनी युरोप दौरा केला त्यात त्यांना आढळले की भारतातील कुटुंब व्यवस्थेबद्दल विदेशात आस्था आहे. एक उदाहरण ४० वर्षापासून एकच मंगळसूत्र, एकच नवरा हा भाबडा प्रश्न तेथे विचारला गेला. कपाळावरील लाल टिकली, कुंकू म्हणजे भारतीय स्त्री अशी ओळख भारतीय आहे हे समाजात दिसत होते. एकत्र कुटुंब व्यवस्था हा समाजाचा देशाचा पाया याची जाणीव घराबाहेर पडल्यावर होते एवढं खरं. कुटुंब विघटन ही जागतिक समस्या होत असताना भारताकडे मात्र ती सोडवण्याची ताकद आहे असे इतर देशांना वाटते हे अनुभवातून कळले.

खरंच आज हिंदू संमेलनातून आम्ही पंच परिवर्तन मांडत आहोत पण आमचा मजबूतपणा ही आमची स्त्री आहे. हिंदू कुटुंबाची ओळख म्हणजे दारा समोरील रांगोळी आणि तुळशी वृंदावन, अशी पूर्ण भारतभर मग ते ग्रामीण असो वा शहरी एकच आहे याचा सार्थ अभिमानही आहे त्या अस्मितेचा वारसा आम्हाला जोपासायचा आहे. आमचं सामर्थ्य, ओळख ही या महिला दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी ठेवावी ही अपेक्षा ... शेवटी एकच...

**तो धनवान कारण ती संपत्ती !**
**तो बुद्धिवान कारण ती मती !**
**तो शक्तिवान कारण ती शक्ती !**
**तो समाधान कारण की शांती !**
**तो बीज कारण ती माती,**
**तो बीज कारण ती माती !**
**हीच आमची संस्कृती,**
**हीच आमची संस्कृती !**



**प्रा.श्रुती चक्रधर भूगुल**
बॅरी आर डी आय के व के डी महा. बडनेरा

# पक्षी अंगणी उतरती! ते का गुंतूनी राहती!

वरील अभंग रचना ही संत एकनाथ महाराजांची आहे. सर्व संत साहित्य हे समाजाप्रती आदर कळकळ, निष्ठा बाळगुन आहेत कारण संतांना मायबाप म्हटले आहे.

**बुडत हे जन देखवे ना डोळा!**
**येतो कळवळा म्हणोनिया!**

या कळवळ्या पोटी समाजाला त्यांच साहित्य सतत मार्गदर्शन करीतच असतात. तसेच समाजाकरिता व त्यातुन वैयक्तिक हित कसे साधता येईल? याचा सुक्ष्म अभ्यास केला आहे. या अभंगाद्वारे आत्मभान जागृत करण्याचे कार्य केले आहे. निसर्गातील छोटे छोटे पक्षी जे आहेत त्यांचे सुक्ष्म निरीक्षण संतांनी केलेले आहे. हे मानवा! हे आयुष्य यशस्वी होण्याकरता तुला पक्षाप्रमाणे दृष्टी ठेवावी लागेल. कुठल्याशा चित्रपटांमध्ये गीत आहे त्यामध्ये सुद्धा जागृत केले आहे.

**जनरे झुठ मत बोलो!**
**खुदा के पास जाना है!**
**वाहा हाथी है ना घोडा है!**
**वहा पैदल ही जाना है!**

तु या संसारामध्ये आसक्त होऊन राहु नको. हे एक दिवस सोडून जावं लागणार त्याकरिता आत्मभानावर येण्यासाठी अभंगाची निर्मिती श्री संत एकनाथ महाराजांनी केलेली आहे. हे मानवा जीवन यशस्वी होण्याकरता तुला पक्षाप्रमाणे दृष्टी ठेवावी लागेल. नीरासक्त जीवनाचा मंत्र दिला आहे व तु पर्यायाने दुखी होणार नाही. पक्ष्यांची असंग्रही वृत्ती ठेवावी लागेल. कारण जीवनाचं अंतिम सत्य म्हणजे मृत्यू आहे. सर्वसाधारणतः समाजातील मानवी जीवनाचे निरीक्षण केलं तर तो मरेपर्यंत दुःखी कष्टी होऊन धनसंचय करण्याकरता अहोरात्र झटत असतो. शेवटी त्याच्या वाट्याला काय येते तर

**कवडी कवडी माया जोडी!**
**जोडी लाख करोड!**
**आया ईश्वर का तुझे बुलाना!**
**चला लंगोटी खोल!**

**कबीर दास महाराजांचा देखील दोहा आहे.**

**माती चुनचुन महल बनाया!**
**लोग कहे घर मेरा!**
**ना घर तेरा ना घर मेरा!**
**चिडिया रैन बसेरा!**

मनुष्य या शरीरावर अहंकार करतो व शेवटी मातीत जातो. आणि हा संसार देखील अस्थाई आहे. पक्षी रात्रभर झाडावर राहतात व पुन्हा उड्डन जातात. याच अभंगात दुसरे उदाहरण संत एकनाथ स्वामींनी दिले आहे ते म्हणजे...

**वस्तीकर वस्ती आला!**
**प्रातःकाळी उठून गेला!**

ज्याप्रमाणे रात्री घरी पाहुणा आला व सकाळी उठुन आपल्या मुक्कामाला तो निघुन गेला. त्याप्रमाणे असे असावे संसारी. आपल्या आजूबाजूला आपण दररोज बघतो मृत्यू हा अटळ आहे. त्याला वयाचे बंधन नाही. उत्पत्ती स्थिती, लय हा क्रम आहे. त्याप्रमाणे संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

**उपजे ते नासे!**
**हे घटिका यंत्र जैसे!**
**परिभ्रमेगा!**
**जीवन जगत असताना या गोष्टीकडे लक्षच नाही.**
**मरे एक त्याचा दुजा शोक वाहे!**
**अकस्मात तोही पुढे जात आहे!.**

असे समर्थ रामदास स्वामी म्हणतात माणसाला फक्त स्मशान वैराग्य येत. नंतर 'तो मी नव्हेच' याप्रमाणे तो पुन्हा आपल्या कोशात अडकल्या जातो. त्याकरिता संतांनी वारंवार आपल्याला सजग केले आहे. मानवाची आयुर्मर्यादा फक्त शंभर वर्षे त्यातही त्याची खात्री नाही. मरणाच्या बाबतीत सांगायचे झाल्यास...

**पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा!**
**याचे भान असेल तर तो नम्रतेने व्यवहार करेल. ग.दि.माडगुळकर म्हणतात**
**दोन ओंडक्याची होते सागरात भेट!**
**एक लाट तोडी दोघा!**
**पुन्हा नव्हें गाठ!**
**क्षणिक आहे तेवी बाळा!**
**मेळ माणसाचा!**

म्हणुन भ्रमाच्या भोवऱ्यात अडकून न पडता त्यांनी आपल्या हातुन सत्कर्मे घडावी याचाच ध्यास घ्यावा. ग.दि.माडगुळकरांनी सुद्धा सावध व्हायला सांगितले. या संतांच्या, कवी लेखकांच्या साहित्यातुन जे जन्माला येणारं साहित्य म्हणजे फक्त विरंगुळा नव्हे तर माणसाला सावध करण्याचे साहित्य आहे. म्हणुन सदैव सावध राहिला तरच सदैव सत्कर्मेच घडत राहतील. असं जर होत राहील तर त्याच्या ठिकाणी सजगता येईल व त्याच्या बुद्धीचा विकास होऊन त्यांच्या विचाराचा प्रवाह वेगळ्या दिशेने प्रवाहित होऊन त्याला सर्वत्र सौंदर्याचा भास होईल. हा उद्देश संत काव्यात आहे असा आत्मभानावर आलेला मनुष्य म्हणजे..

**अशी ज्याची दृष्टी!**
**पडेलही सृष्टी!**
**कृपेची वृष्टी करितो देव!**
**ज्याच्या मनाची शुद्धता होत जाईल**
**कारण म्हणतात ना**
**स्वार्था विना सेवा जिथे!**
**तेथे तुझे पद पावन!**
**तीमीरा तुनी तेज्याकडे प्रभू**
**आमच्या ने जीवना!**
**मन ज्याचे शुद्ध! होईल जो क्रुद्ध!**
**जीवनाचे युद्ध! जिंकील तो!**
**खरोखर जग हे नश्वर! मानावा ईश्वर आहे एक!**


संतांच्या वचनाचा सखोल अभ्यास केल्यास आपण कुठेतरी गुंतलो जात आहोत आता तरी भानावर यायला पाहिजे. तु संसार कर्म कर पण आसक्त न होता जीवननिर्वाहा पुरता विचार करून पक्षापासून निरासक्त जीवन जगण्याचा संदेश श्री संत एकनाथ महाराजांनी त्यांच्या अभंगाद्वारे मानवाला अनमोल विचार प्रदान केला आहे.

**पक्षी अंगणी उतरती!**
**ते का गुंतुनी राहती!**
**तैसे असावे संसारी!**
**जववरी प्राचीनाची दोरी!**
**वस्तीकर वस्ती आला!**
**प्रातःकाळी उठून गेला!**

हा संत एकनाथ महाराजांचा अतिशय लोकप्रिय अभंग आहे. यातून संसारातील नश्वरता आणि प्रपंचात परमार्थ कसा करावा हे शिकवतो. पक्षी जसे अंगणात तात्पुरते उतरतात. तसेच मनुष्य जीवनात नातेसंबंध तात्पुरती आहे हे यात सांगितले आहे. हे समजुन आयुष्य क्रमण करावे व प्रपंच करावा. अंगणात दाण्याचा सडा पडला आहे पण आकाशात उडणारा पाखरांचा थवा ते दाणे टिपण्यास येतो आणि त्यांचं पोटभरे पर्यंत दाणे टिपतात आणि पोट भरल्यावर कितीही दाणे शिल्लक राहिले तरी तो मोहात गुंतून न पडतात आकाशात उडून जातो. तद्वतच मला एक दिवस या जगातुन निघुन जावयाचे आहे म्हणुन फक्त आणि फक्त कर्मच करीत राहावे असं जगणं असेल तर एकनाथ स्वामी म्हणतात...

**ऐसे असता भय कवण मग!**
**मरणाची भीती शिल्लक राहणार नाही.**
**ऐसे असावे संसारी!**
**जोवरी प्राचीनाची दोरी!**

जोपर्यंत आयुष्यमान आहे तोपर्यंत पक्षाप्रमाणे निरलेप, निरासक्त राहा. वरील श्री संत एकनाथ महाराजांचा अभंग म्हणजे जो निद्रिस्त समाज आहे त्याला या अभंगाद्वारे जागृत केले आहे. ऐसे असावे संसारी



**पुष्पा सु.वरखेडकर**
माजी पर्यवेक्षिका
पी.डी.कंन्या शाळा, वरुड

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

अमरावतीच्या डॉ.पंजाबराव देशमुख स्मृति रुग्णालयाला

# हेमलता गाडगे यांचे मरणोपरांत देहदान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड –** शहरातील साखरपुडा परिसरातील रहिवासी तथा नगरपरिषद कार्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी शेषराव गाडगे यांच्या पत्नी हेमलता गाडगे यांचे वयाच्या ७१ व्या वर्षी काल (ता.४) मध्यरात्रीच्या सुमारास हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे पार्थिव कुटूंबियांनी अमरावतीच्या डॉ.पंजाबराव देशमुख स्मृति रुग्णालयाला दान केले.

हेमलता गाडगे यांची मध्यरात्री १ च्या सुमारास अचानक प्रकृती बिघडली आणि क्षणातच त्या घरातील सोफ़यावर जावुन कोसळल्या. कुटूंबियांनी त्यांना तातडीने डॉ.पवार यांचे रुग्णालयात हलविले परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले. गेल्या अनेक दिवसांपासुन हेमलता गाडगे व शेषराव गाडगे यांनी मृत्युनंतर देहदान करण्याच्या संकल्प व्यक्त केला होता परंतु देहदानाचा फॉर्म भरण्याची प्रक्रिया अपूर्ण राहली होती, परंतु हेमलता यांच्या निधनानंतर शहरातील वैद्यकीय तज्ञ डॉ.विजय देशमुख यांनी डॉ.पंजाबराव देशमुख स्मृति रुग्णालयाचे डीन यांचेशी चर्चा करुन देहदानाबाबतची प्रक्रिया पुर्ण केली आणि सकाळी १०.३० च्या सुमारास अमरावतीहून रुग्णवाहिका दाखल होवुन ११.३० च्या सुमारास कुटूंबियांनी सर्व सोपस्कर पुर्ण करुन पार्थिव अमरावतीकडे रवाना केले.

हेमलता शेषराव गाडगे यांनी आपल्या मृत्यूनंतर देहदान करुन समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांचा पार्थिव देह अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज येथे वैद्यकीय शिक्षणासाठी दान करण्यात आला. गाडगे कुटुंबियांनी घेतलेल्या या निर्णयामुळे वैद्यकीय विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण मदत होणार असून, समाजात देहदानाबाबत जनजागृतीस चालना मिळणार आहे. हेमलता गाडगे यांच्या या महान कार्याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात कुटुंबियांनीही इतरांनी देहदानासारख्या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात मानवतेची भावना अधिक बळकट होत असल्याचे मत व्यक्त होत आहे. दरम्यान पती शेषराव गाडगे यांनी सुध्दा देहदानाचा संकल्प केला असून या दोघांच्या निर्णयाचे सर्वत्र स्वागत करण्यात येत आहे.

हेमलता गाडगे यांच्या मागे पती शेषराव गाडगे, १ मुलगा, ३ मुली, सुन, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.



**वरुड :** अमरावती ग्रामीण पोलिसमध्ये नितेश अंबाडकर यांची निवड झाली. या निमित्ताने ब्रोन क्रिकेट क्लब वरुड तर्फे नितेशचे पुष्पगुच्छ देवुन अभिनंदन करुन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी बालरोग तज्ञ डॉ.प्रविण चौधरी, बधिरिकरण तज्ञ डॉ.पंकज बिजवे, अस्थिरोग तज्ञ डॉ.महेंद्र राऊत, शैलेश ठाकरे, सचिन परिहार, डॉ.रुपेश महाजन यांचेसह ब्रोन क्रिकेट क्लबचे सदस्य उपस्थित होते.

# सीएम ममता बॅनर्जीनंतर आता माजी सीएम अरविंद केजरीवाल हायकोर्टात स्वतः बाजू मांडणार

## कथित मद्य धोरण केसमध्ये 'त्या' न्यायमूर्तींना हटवण्याची मागणी करणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***नवी दिल्ली* –** दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल आज (६ एप्रिल) कथित मद्य घोटाळा प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयात स्वतः हजर राहून युक्तिवाद करण्याची शक्यता आहे. हे प्रकरण, केजरीवाल, मनीष सिसोदिया आणि इतर आरोपींना दिलासा देणाऱ्या सत्र न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या सीबीआयच्या याचिकेशी संबंधित आहे. रविवारी, मुक्तता झालेल्या केजरीवाल आणि इतर २२ आरोपींनी या प्रकरणाची सुनावणी करणारे न्यायमूर्ती स्वर्ण कांत शर्मा यांना खटल्यातून दूर राहण्याची मागणी केली. आरोपींनी हे प्रकरण दुसऱ्या खंडपीठाकडे हस्तांतरित करण्याची विनंती केली होती.

मात्र, ही मागणी फेटाळण्यात आली आणि असे म्हटले गेले की, न्यायाधीशांना खटल्यातून दूर ठेवण्याचा निर्णय संबंधित न्यायमूर्ती घेतात. जेव्हा हितसंबंधांचा संभाव्य संघर्ष, पक्षपात किंवा निःपक्षपातीपणाबद्दल प्रश्न निर्माण होतात, तेव्हा न्यायाधीश स्वतःला खटल्याच्या सुनावणीतून दूर ठेवतात.

# एल्फिन्स्टन पूल इतिहासजमा : दोन वर्षांत नवा दुमजली पूल उभारणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई –** परळ आणि प्रभादेवीला जोडणारा ११३ वर्षांचा इतिहास असलेला एल्फिन्स्टन रोड उड्डाणपूल रविवारी इतिहासजमा झाला. या पुलाचे शेवटचे गर्डर काढण्याचे काम रविवारी यशस्वीपणे पूर्ण झाले. दरम्यान, प्रभादेवी उड्डाणपुलाच्या पाडकामासाठी दीड तास विलंब झाल्याने सीएसएमटी ते दादर दरम्यान अप आणि डाऊन लोकल सेवा सकाळी ७.०६ वाजता सुरू झाली. तर, सर्व मार्गिका सुरळीत होण्यास ७.१४ वाजले. यामुळे प्रवाशांचे अतोनात हाल झाले. मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील निला यांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ आणि ५ एप्रिलच्या मध्यरात्री सीएसएमटी ते दादर दरम्यान विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेऊन हे काम पूर्ण केले. रविवारी सकाळी ७.३० वाजता उपनगरीय रेल्वे सेवा पुन्हा सुरू झाली.

# कै.उषाबाई पोटे यांचे निधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***अचलपूर* –** परिसरातील बारी समाजातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्व कै.उषाबाई पोटे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे संपुर्ण परिसरात आणि विशेषतः बारी समाजात शोककळा पसरली आहे. कै.उषाबाई पोटे या अत्यंत प्रेमळ आणि सुसंस्कृत स्वभावाच्या होत्या. त्यांच्या पश्चात २ मुले, सुना, नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे. त्यांचे मोठे चिरंजीव अनिल पोटे हे सध्या अचलपूर तहसिल कार्यालयात नायब तहसिलदार म्हणुन कार्यरत आहेत. आपल्या मातोश्रींच्या निधनाने पोटे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून समाजातील विविध स्तरांतुन त्यांचे सांत्वन करण्यात येत आहे.

# सुनेत्रा पवारांनी बारामती पोटनिवडणुकीत शेवटच्या क्षणी गेम फिरवला, लक्ष्मण हाकेंची माघार, दत्तात्रय भरणेंनी मन वळवलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई –** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या रणधुमाळीत आज एक मोठी राजकीय घडामोड घडली आहे. ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी आपला उमेदवारी अर्ज न भरता निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. महायुतीच्या नेत्यांनी आणि विशेषतः दत्तात्रय भरणे यांनी केलेल्या यशस्वी मध्यस्थीमुळे हाके यांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा जाहीर केल्याचे समजते. यामुळे बारामतीमधील लढत आता थेट सुनेत्रा पवार विरुद्ध काँग्रेसचे आकाश मोरे अशी होणार आहे. दत्तात्रय भरणे यांची यशस्वी 'फिल्डिंग' लक्ष्मण हाके हे आपला उमेदवारी अर्ज भरण्यासाठी बारामतीत दाखल झाले होते. मात्र, त्याच वेळी महायुतीचे नेते कामाला लागले. मंत्री दत्तात्रय भरणे यांनी तातडीने लक्ष्मण हाके यांची भेट घेतली. अजितदादांच्या निधनामुळे निर्माण झालेली भावनिक परिस्थिती आणि बारामतीच्या विकासाची निरंतरता लक्षात घेऊन ही निवडणूक बिनविरोध व्हावी किंवा किमान महायुतीला पाठिंबा मिळावा, यासाठी भरणे यांनी हाके यांची मनधरणी केली.

सुनेत्रा पवारांच्या एका फोनने बदलले समीकरण स्वतः सुनेत्रा पवार यांनी लक्ष्मण हाके यांना फोन करून चर्चेचे आवाहन केले होते. याबद्दल बोलताना हाके म्हणाले की, सुनेत्रा ताई पवार, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, उदय सामंत, धनंजय मुंडे आणि दत्ता भरणे या सर्वच वरिष्ठ नेत्यांनी माझ्याशी संपर्क साधला. या सर्वांनी माझ्याशी संपर्क साधल्यानंतर मी विचार केला. सुनेत्रा पवार यांचा ज्यावेळेस मला फोन आला, त्यावेळेस मी ठरवले की नाही. इतके सगळे लोक आपल्याला फोन करत असतील तर आपण विचार करायला हवा, असे म्हणत त्यांनी या निवडणुकीतून माघार घेतली. मी माझ्या प्रश्नावर ठाम राहणार लक्ष्मण हाके यांनी पुढे म्हणाले की, माझा आता देखील फॉर्म तयार आहे. पण, विद्रोहाची भूमिका घेत असताना अशा गोष्टींना सामोरे जावेच लागते. मी माझ्या प्रश्नावर ठाम राहणार आहे. मी माझे प्रश्न आक्रमकपाने मांडतच राहणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले. सुनेत्रा पवारांचा कॉल आला अन... मला सगळ्या नेत्यांचे कॉल आले. पण माझ्यासाठी अंतिम कॉल होता, माझ्यासाठी जो संवेदनशील होता, तो महाराष्ट्राच्या महिला उपमुख्यमंत्र्यांचा होता. हा कॉल आल्यानंतर मला वाटलं, येस... महाराष्ट्राची महिला उपमुख्यमंत्री आहे.

# जरुड येथे हनुमान जयंतीच्या उत्सवानिमित्य विविध कार्यक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




***जरुड* –** येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी स्थानिक बजरंग दल व मित्र परिवार तसेच हनुमान जयंती उत्सव समिती यांच्या वतीने श्रीराम भक्त हनुमान यांच्या जयंती उत्सवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त गावातील सर्व हनुमान मंदिरावर झेंडा, तोरण, आधुनिक काळातील लायटिंग लावुन धार्मिक वातावरण तयार करण्यात आले.

तसेच दोन दिवस पूजा, हवन, भजन, कीर्तन, काला प्रसाद, महाप्रसाद आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तसेच बजरंग दल व मित्र परिवार यांच्या वतीने भव्य शोभायात्रा काढण्यात आली. त्यावेळी संपूर्ण परिसरात उत्साहाचे व आनंदाचे तसेच धार्मिक वातावरण तयार झाले. मोठा मारुती देवस्थान, जुना बस स्टॉप, गांधी चौक येथील मारुती देवस्थान, लहान मारोती देवस्थान, मारोती देवस्थान समिती, नेहरु चौक, मारोती देवस्थान, विठ्ठल चौक, जय बजरंग देवस्थान, नवीन बस स्टॉप येथे याशिवाय गावातील मारुती देवस्थान येथे हनुमान जयंती उत्सव साजरा करण्यात आला. तसेच या निमित्य काढलेल्या भव दिव्य रॅलीमध्ये श्रीराम व पवनसूत हनुमान याचे तसेच विविध देवतांचे प्रतिकात्मक रूप तसेच विविध प्रकारचे नृत्य हे शोभून दिसत होते. श्रीराम भक्त हनुमान जिचा जय घोषाने जरुड नगरी दुमदुमून गेली. शेवटी गावातील हजारो भाविकांनी ठीक ठिकाणी महाप्रसादाचा लाभ घेतला आणि हनुमान जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या उत्सवा दरम्यान संपूर्ण परिसरात गावात शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणुन ठाणेदार अर्जुन ठोसरे यांचे मार्गदर्शनाखाली जरुड बीट जमादार विनोद बाबुलकर, मिनेश खांडेकर व सहकारी यांचे वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला.

भाजप ओबीसी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी

# टेंभुरखेडाच्या रोशनी निंभोरकर यांची नियुक्ती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड –** टेंभुरखेडा येथील सरपंच तथा भारतीय जनता पार्टीच्या एकनिष्ठ कार्यकर्त्या रोशनी रवींद्र निंभोरकर यांची भाजप ओबीसी महिला आघाडी जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. रोशनी निंभोरकर यांनी विविध पदे भुषविली आहेत.

त्या भुषविलेल्या पदांमधूनच त्यांनी खुप चांगले कार्य केले आहे. त्या टेंभुरखेडाच्या सरपंच आणि आता त्यांची ग्रामपंचायत टेंभुरखेडा येथे प्रशासकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी महाराष्ट्र ग्रामसंवाद परिषद जिल्हा सरचिटणीस, ओबीसी महिला तालुकाध्यक्ष ही पदे सुद्धा भुषविली आहेत. सरपंचपदाचा कार्यकाळ सांभाळत असतांना गावांमध्ये केलेल्या कामाची दखल घेत सरपंच ऑफ द इयर हा पुरस्कार सुद्धा त्यांनी प्राप्त केला आहे.

आदर्श सरपंच म्हणुन जिल्हा परिषदेने त्यांना जिल्हा जिल्ह्यातील सर्व महिला सरपंच ग्रामपंचायत सदस्यांना ट्रेनिंग देण्यासाठी त्यांची मास्टर ट्रेनर म्हणुन नियुक्ती केली होती आणि आता भारतीय जनता पार्टीने ओबीसी महिला जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.


रोशनी निंभोरकर या राज्यसभा खासदार डॉ.अनिल मुंडे व आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या अत्यंत विश्वासु कार्यकर्त्या आहेत. त्यांचे नेतृत्वात गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय जनता पार्टीमध्ये कार्यरत असून त्यांच्या कार्याची दखल घेत भाजपा ओबीसी महिला जिल्हाध्यक्षपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, ओबीसी ग्रामीण जिल्हाध्यक्ष धनंजय उमप, महामंत्री सुमित पवार यांनी अभिनंदन केले असून डॉ.वसुधा बोंडे, भाजपा जिल्हाध्यक्ष अनिता तिखिले, माजी जि.प.सभापती अर्चना मुरुमकर, माजी पं.स.सदस्य अंजली तुमराम, माधुरी भगत, विद्या भुंबर, प्रतिभा महल्ले, अनिता लांजेवार, सुनंदा लाडवीकर, प्रतिभा राऊत, राजकुमार राऊत, भाग्येश देशमुख, डॉ.आसावरी कोहळे यांनी त्यांच्या निवडीबद्दल अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्राकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांचा जनतेनेच शाहिस्तेखान केला

**भाजप मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा संजय राऊत यांच्यावर प्रहार**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***मुंबई*** – महाराष्ट्राकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांची बोटे छाटण्याचे काम महाराष्ट्रातील जनतेने विधानसभा, जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुकीतच केले असल्याचा घणाघात करत त्या निवडणुकांमध्ये भाजपा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आशीर्वाद देण्याचे काम जनतेने केले आहे. कधीकाळी राज्यातील मोठा पक्ष असलेल्या उबाठाने आपल्या पक्षाचा आत्मा सोडला असून ती काँग्रेसच्या वळचणीला गेल्याचा प्रहार भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी सोमवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत नवनाथ बन बोलत होते.

राजकारणातील संवेदनशीलतेबाबत बोलायचे तर या संवेदनशीलतेला नख लावण्याचे काम उबाठाने केले आहे. नारायण राणे, कंगना राणावत आणि मोहित कुंबोज यांचे घर पाडणे, व्यंगचित्र काढले म्हणून नौदल अधिकाऱ्याचा डोळा फोडणे, ही असंवेदनशीलतेचीच उदाहरणे आहेत. महाविकास आघाडीच्या राज्यातच केतकी चितळे तसेच पत्रकारांचा आवाज दडपण्यासाठी त्यांनाही अटक झाली तेव्हा संवेदनशीलतेवर बोलण्याचा अधिकार संजय राऊत यांनी कधीच गमावला आहे, अशी टीका बन यांनी केली.

बारामती आणि राहुरी पोटनिवडणुकीमध्ये कोणती भूमिका घ्यावी याबाबत उबाठा आणि संजय राऊत यांच्यात संभ्रम आहे. संजय राऊत यांनी आतापासूनच काँग्रेसची तळी उचलण्याचे धोरण अवलंबले आहे. आताच ते काँग्रेसचा उदो उदो करत आहेत. कारण आणखी काही वर्षांनी आपल्याला काँग्रेसमध्येच जायचे आहे हे त्यांनी ठरवलेलेच आहे. त्यामुळे काँग्रेस नेते हर्षवर्धन सकपाळ, विजय वडेट्टीवार, नाना पटोले आणि बाळासाहेब थोरात अशा नेत्यांपेक्षा आपल्यालाच काँग्रेस अधिक कळते असे दाखवून संजय राऊत यांना राहुल गांधी यांना प्रभावित करायचे असल्याचे नवनाथ बन यांनी सुनावले.

भाजपाने नाती जपली नाहीत असा आरोप संजय राऊत करत आहेत. मात्र ज्यांनी स्वत:च्या भावाचे नाते जपले नाही त्यांनी भाजपाबद्दल बोलू नये. आदित्य ठाकरे यांच्याविरोधात मनसेने उमेदवार दिला नव्हता. मात्र उबाठाने अमित ठाकरे यांच्या पहिल्याच निवडणुकीत त्यांच्याविरोधात उमेदवार उभा केला तेव्हा त्यांना नाती आणि परंपरा आठवली नाही का, असा सवाल बन यांनी केला. महाविकास आघाडी म्हणजे तीन चाकी रिक्षा आहे, जिची तिन्ही चाके वेगवेगळ्या दिशांना जातात. बारामती आणि राहुरी पोटनिवडणुकांमध्ये यातील घटक पक्षांचे एकमत होत नाही.

# नागपूरकरांवर पाणीसंकट : सलग २ दिवस या भागात राहणार पाणी पुरवठा बंद

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**नागपूर** :– नागपूर शहरातील नागरिकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. तांत्रिक कामांमुळे शहरात ७ एप्रिल आणि ८ एप्रिल या दोन दिवसांत पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार असून, अनेक भागांमध्ये अल्प प्रमाणात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

का बंद राहणार पाणी? महापालिकेकडून मुख्य जलवाहिनीवर नवीन वॉल्व्ह बसवण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामासाठी पेंच जलशुद्धीकरण प्रकल्प तब्बल ३६ तास बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील नऊ झोनमधील मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा खंडित होणार आहे.

कामाचा कालावधी हे काम ७ एप्रिल सकाळी १० वाजल्यापासून सुरू होऊन ते ८ एप्रिल रात्री १० वाजेपर्यंत चालणार आहे. या कालावधीत त्यामुळे नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. नागरिकांना प्रशासनाचे आवाहन महापालिकेकडून नागरिकांना आधीच पाण्याची साठवण करून ठेवावी, तसेच पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दोन दिवसांच्या या पाणी बंदीमुळे नागपूरकरांना काही प्रमाणात गैरसोय होणार असली, तरी भविष्यातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी हे काम आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी सत्यम गांधी रुजू : संजीता महापात्र यांची सांगली मनपा आयुक्तपदी बदली

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



***अमरावती*** – अमरावती जिल्हा परिषदेचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून सत्यम गांधी यांनी आज आपला पदभार अधिकृतपणे स्वीकारला.

प्रशासकीय फेरबदल आणि अदलाबदल राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने नुकत्याच केलेल्या सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये अमरावती आणि सांगली या दोन शहरांमध्ये परस्पर बदली झाल्याचे पाहायला मिळत आहे.


सत्यम गांधी: अमरावती जिल्हा परिषदेत रुजू होण्यापूर्वी ते सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळात सांगलीतील नागरी समस्या आणि प्रशासकीय शिस्तीवर त्यांनी विशेष भर दिला होता.

संजीता महापात्र: अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यक्षम कामगिरी केल्यानंतर आता त्यांची नियुक्ती सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या आयुक्त पदी करण्यात आली आहे.

पदभार स्वीकारल्यानंतरचे पहिले पाऊल पदभार स्वीकारल्यानंतर सत्यम गांधी यांनी जिल्हा परिषदेच्या विविध विभाग प्रमुखांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या केंद्र व राज्य सरकारच्या लोकोपयोगी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा आपला मानस व्यक्त केला. ग्रामीण भागाचा विकास, शिक्षण आणि आरोग्य या विषयांना प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांनी नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले, तर मावळत्या अधिकारी संजीता महापात्र यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

## दिनविशेष

**०६/०४/१६५६ : शिवाजी महाराजांनी चंद्रराव मोरे यांचा पराभव करुन रायगड किल्ला ताब्यात घेतला.**



## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१,४६,६०८ रु.(१०ग्रॅम)

२२ सोने - १,३४,२९३ रु.(१०ग्रॅम)

चांदी - २,५५,००० रु. (प्र.किलो)



## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६५० – | २००० |
| गहू – | २५०० – | ३००० |
| तूर – | ६१०० – | ६३९० |
| मूग – | ६५०० – | ७००० |
| उडीद – | ६००० – | ७००० |
| हरभरा – | ५६०० – | ५९०० |
| सोयाबिन – | ४१०० – | ४३५० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ८२०० – | ९३०० |
| भुईमूग – | ५१५० – | ५३५० |
| मका – | २२०० – | २३०० |

**श्री गुरुदेव सेवा मंडळ वरुड तालुक्याच्या वतीने**

# ग्रामजयंती बाल सुसंस्कार प्रचार प्रबोधन अभियानाला सुरुवात

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड** – अ.भा.श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम मोझरी अंतर्गत श्री गुरुदेव सेवा मंडळ वरुड तालुक्याच्या वतीने गुरुवर्य स्व.पुरुषोत्तम कापसे (गुरुजी) स्मृती श्री गुरुदेव सेवा मंडळ सुरळी (सर्कल) व्दारा १ ते ३० एप्रिल दरम्यान ग्रामजयंती बाल सुसंस्कार प्रचार प्रबोधन अभियान राबविण्यात येत आहे.

३० एप्रिल वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्मदिन असून तो ग्रामजयंती दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. ग्रामगीतेचा प्रसार आणि प्रचार व्हावा, या उद्देशाने १ ते ३० एप्रिल दरम्यान सायंकाळी ७.१५ वाजता आयोजीत या ग्रामजयंती बाल सुसंस्कार प्रचार प्रबोधन अभियान सुरुवात मुसळखेडा (हनुमानपेठ) येथील श्री योगीराज बाबा आश्रमातून करण्यात आली. त्यानंतर फत्तेपुर, घोराड, डवरगाव, ईसापुर या ठिकाणी निलिमा कुबडे, प्रा.डॉ.चंद्रभुज कदम, सुप्रिया बंदे, साहेबराव पेठे, अशोकराव खापरे, मोहन साबळे, रजनी केवटे, हितेश गावंडे, डॉ.मिना बंदे, राजेंद्र कापडे यांचे प्रबोधन पार पडले. ६ एप्रिल ते १७ एप्रिल दरम्यान वाठोडा, इस्माईलपुर, ढगा, चांदस, सावंगी, नागझिरी, पुसला, जरुड, गाडेगांव, टेंभुरखेडा, इसंब्री या ठिकाणी सायंकाळी ७.१५ वाजता अनुक्रमे निलिमा मालपे, सतिश सोनुले, प्रा.एन.जी मरसकोल्हे, संजय काकडे, प्रा.राजेंद्र काळमेघ, गुणवंतराव साबळे, अनिता मिसळे, मनिष सावरकर, उषा शेंदुर्से, अनिल तडस, रंजना फरकाडे, विनोद मिसळे, जया नेरकर, अमोल गावंडे, डॉ.स्वाती विटाळकर, ॲड.विनोद भोसे, स्वाती शेळके, दिलीप भोयर, ॲड.प्रणिता चव्हाण, भुषण गावंडे, सविता सावरकर, शामराव सोलव यांचे प्रबोधन होणार आहे. २७ एप्रिल रोजी शहरातील श्री गुरुदेव नगर येथे गुरुवर्य स्व.पुरुषोत्तम कापसे गुरुजी यांचा अकरावा स्मृतिदिन घेण्यात येणार आहे. २९ एप्रिलला सायंकाळी ७ वाजता सुरळी येथील गोपालकृष्ण सेवाश्रम येथे समारोपीय कार्यक्रम,सामुदायिक प्रार्थना व ग्रामनाथांचा सत्कार घेण्यात येणार आहे, याप्रसंगी शैलेजा गोरडे, स्मिता केंडे, डॉ.मनोहर आंडे, सि.टी.पठाण आदी प्रबोधन करणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन श्री गुरुदेव सेवा मंडळ व ग्रामवासियांच्या वतीने करण्यात येणार आहे. ३० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता आंतरराष्ट्रीय अध्यात्म केंद्र व प्रार्थना मंदीर वरुड येथे ग्रामजयंती प्रचार प्रबोधन अभियानाचा समारोपीय कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

या अभियानाकरीता ह.भ.प.लक्ष्मणराव गीद, डॉ.निळकंठ यावलकर, अरविंद माटे, चंद्रशेखर बेले, गोपाल आजनकर, डॉ.प्रकाश शिरभाते, अनिल महाराज, राजु उघडे, हेमंत हेलोडे, जगदीश गुल्हाने, प्रभाकर पांडे, प्रभाकर घाटोळे, निलेश कोहळे, माणिकदास बेलुरकर, डॉ.वर्षा भोसे, माधुरी भगत, शुभांगी कापडे, दामिनी उमेकर, सृष्टी गावंडे, योगिता झोड, पत्रकार चंद्रकांत भड, प्रविण सावरकर, ग्रामजयंती प्रचार प्रबोधन अभियानाचे संचालक दिलीप घाटोळे आदी परिश्रम घेत आहेत.

यासंदर्भात ग्रामगीता प्रचारक हरीभाऊ झोड (९४२२५४४१४३) यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन श्री गुरुदेव सेवा मंडळ सुरळीच्या वतीने एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

# मध्यपूर्व युद्ध पुन्हा पेटलं! इराणचा भारताला संपर्क, उच्चस्तरीय चर्चा सुरु

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** :– इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष शांत होण्याचे नाव घेत नाहीये. मध्य पूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे होर्मूझ सामुद्रधुनी सध्या जागतिक चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतालाही याचे थेट परिणाम जाणवू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याशी इराणकडून थेट संपर्क साधण्यात आला आहे.

भारत-इराण उच्चस्तरीय चर्चा इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी जयशंकर यांना फोन करून सध्याच्या परिस्थितीवर चर्चा केली. याचबरोबर कतारचे पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री यांच्यासोबतही भारताने संवाद साधला. मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे व्यापार, ऊर्जा पुरवठा आणि सुरक्षेच्या मुद्द्यांवर ही चर्चा महत्त्वाची मानली जात आहे.

ट्रम्प यांचा इराणला अल्टिमेटम दरम्यान, अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला होर्मूझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी ४८ तासांचा अल्टिमेटम दिल्याची माहिती समोर आली आहे. सामुद्रधुनी खुली केली नाही तर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आल्याचे सांगितले जाते.

भारताची जहाजे अडकली होर्मूझ सामुद्रधुनीत तणाव वाढल्यामुळे भारतासह अनेक देशांची जहाजे अडकली असल्याची माहिती आहे. ही ३२ किमी अंतर असलेली सामुद्रधुनी जागतिक तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची असून, जगातील मोठ्या प्रमाणात कच्चे तेलाची याच मार्गाने जलवाहतूक केली जाते.

तेल दरवाढ आणि जागतिक परिणाम सामुद्रधुनीत अडथळे निर्माण झाल्याने जागतिक बाजारात तेलाच्या किमती झपाट्याने वाढू लागल्या आहेत. अनेक देशांमध्ये इंधन तुटवडा आणि आर्थिक तणाव निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या भारतात पुरेसा तेल साठा आणि गॅससाठा असला तरी अनेक देशांत तेल आयात करणाऱ्या देशांसाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक ठरू शकते.

होर्मूझ सामुद्रधुनीतील तणाव हा केवळ प्रादेशिक मुद्दा राहिलेला नसून जागतिक अर्थव्यवस्था आणि ऊर्जा सुरक्षेसाठी मोठे आव्हान ठरत आहे. इतर देशांमध्ये या युद्धामुळे कोणतीही भीषण परिस्थिती जाणवू नये यासाठी भारतासह अनेक देश परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२६६/२०२६** **ने.ता.०७/०५/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती पंचफुला गंगाधर धुर्वे, वय अं.५२ वर्ष, धंदा-गृहिणी, २) शुभम गंगाधर धुर्वे, वय अं.३१ वर्ष, धंदा-मजुरी, ३) कु.प्रिया गंगाधर धुर्वे, वय अं.२६ वर्ष, धंदा-गृहिणी, ४) श्रीमती पार्वती गोविंद धुर्वे, वय अं.७४ वर्ष, धंदा-गृहिणी, क्र.१ ते ४ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत गंगाधर गोविंदा धुर्वे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०४/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# मेट्रो लोकार्पणाला अखेर उद्याचा मुहूर्त

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई :-** बहुप्रतीक्षित दहिसर-मीरा भाईंदर मेट्रो ९ मार्गिकेचा टप्पा १ आणि डी. एन. नगर ते मंडाले, मानखुर्द मेट्रो २ ब मार्गिकेच्या पहिल्या टप्प्याचे अखेर ७ एप्रिल रोजी लोकार्पण करण्यात येणार आहे. पूर्व उपनगरात मेट्रो २ ब मार्गिकेच्या निमित्ताने पहिली मेट्रो प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. या दोन मेट्रो मार्गिकांसह ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. तसेच पॉड टॅक्सी प्रकल्पाचे भूमिपूजनही ७ एप्रिल रोजी पार पडणार आहे. मेट्रो लाईन ९ मार्गिकेचा पहिला टप्पा आणि मेट्रो लाइन २ ब मार्गिकेच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण ३ एप्रिल रोजी करण्याचे नियोजन एमएमआरडीएने केले होते. मात्र काही कारणांमुळे या दोन मार्गिकांचे लोकार्पण लांबणीवर गेले होते. अखेर एमएमआरडीएने या मार्गिकांच्या लोकार्पणाची तारीख जाहीर केली आहे. त्यानुसार ७ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एमएमआरडीएचे अध्यक्ष एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत होणार आहे.

# आखाती युद्धामुळे कांद्याची निर्यात तब्बल ४५ टक्क्यांनी घटली

## कंटेनर वाहतूक खर्चात मोठी वाढ झाल्याचा परिणाम

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**लासलगाव -** अमेरिका, इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचा थेट परिणाम देशातील कांदा निर्यातीवर होत असून आखाती देशांमध्ये होणारी कांद्याची निर्यात गेल्या वर्षीच्या मार्च महिन्याचे तुलनेत या वर्षी सुमारे ४५ टक्क्यांनी घटल्याची माहिती समोर आली आहे.



युद्धजन्य परिस्थितीमुळे कंटेनर वाहतूक खर्चात मोठी वाढ झाल्याने निर्यात मंदावली असताना हम भी किसीसे कम नही अशी भूमिका कांदा निर्यातदारांनी घेत मार्च २०२६ मध्ये अंदाजे ३५० कंटेनरद्वारे आखाती देशांमध्ये कांद्याची निर्यात केली. मात्र मार्च २०२५ मध्ये हीच निर्यात सुमारे ६०० कंटेनरपर्यंत झाली होती. एकूण जागतिक स्तरावरही कांदा निर्यात सुमारे ४५ टक्क्यांनी घटल्याची माहिती कृषीमाल निर्यातदार संघटनेचे उपाध्यक्ष विकास सिंग यांनी सांगितले. आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे कांदा निर्यात घटल्याचा थेट परिणाम लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांद्याच्या दरावर दिसून आला. मार्च २०२६ मध्ये उन्हाळी कांद्याला जास्तीतजास्त १५०० रुपये प्रति क्विंटल तर लाल कांद्याला १४१७ रुपये असा दर मिळाला.

# वैमानिकाची थरारक सुटका : अमेरिकेची 'ऐतिहासिक' मोहीम

## शेकडो कमांडो, डझनभर लढाऊ विमानांचा सहभाग

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वॉशिंग्टन -** इराणने पाडलेल्या लढाऊ विमानातील बेपत्ता अमेरिकी वैमानिकाला शोधून त्याची सुटका करण्यात यश आले आहे. याबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी पहाटे सोशल मीडियावर माहिती दिली. दरम्यान, आमच्या हद्दीतून वैमानिक सुटला असला तरी हा अमेरिकेचा पराभवच आहे, असे इराणने म्हटले आहे.





शुक्रवारी इराणने एफ-१५ हे लढाऊ विमान पाडल्यानंतर अमेरिकेने इराणच्या डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणावर शोध आणि बचाव मोहीम सुरू केली होती, तर दुसरीकडे इराणने ङ्गशत्रू वैमानिकङ्ख पकडून देणाऱ्याला साठ हजार डॉलरचे बक्षीस जाहीर केले होते. या विमानातील दुसरा वैमानिक पूर्वीच सुखरूप बाहेर पडला होता.

हा वैमानिक इराणच्या हाती लागला तर अमेरिकेची मोठी नामुष्की झाली असती. त्यामुळे गेले दोन दिवस त्याच्या सुटकेसाठी मोहीम राबवली जात होती. अखेर शनिवारी चार एप्रिलच्या रात्री अमेरिकेच्या विशेष कृती दलाने अत्यंत धाडसी व तितक्याच जोखमीची कारवाई केली आणि थेट इराणमध्ये प्रवेश केला. या मोहिमेत एकाही अमेरिकन सैनिकाचा मृत्यू झाला नाही. इराणमध्ये अडकलेला हा वैमानिक अधिकारी बीकन आणि एका सुरक्षित संपर्क साधनाच्या माध्यमातून बचाव पथकाच्या संपर्कात होता. जेव्हा अमेरिकन कमांडो त्या अधिकाऱ्याजवळ पोहोचले, तेव्हा जोरदार गोळीबार सुरू झाला. अमेरिकन लढाऊ विमानांनी अधिकाऱ्याच्या ठिकाणाजवळून जाणाऱ्या इराणी ताफ्यांना दूर ठेवण्यासाठी त्यांच्यावर बॉम्बफेक केली.

# खरातशी फोन संभाषणाची माहिती फुटल्याची चौकशी

## देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नाशिक -** स्वयंघोषित भोंदूबाबा अशोक खरातला केलेल्या कथित फोन कॉलची माहिती फुटली कशी याची चौकशी केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिले. खरातच्या मालमत्तेची ईडीमार्फत चौकशी केली जाईल, असेही त्यांनी जाहीर केले.




राष्ट्रवादीच्या रुपाली चाकणकर यांनी १७७ वेळा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १७ वेळा खरातशी फोनवरून संभाषण केले होते, असा कथित तपशील अंजली दमानिया यांनी दोन दिवसांपूर्वी उघड केला होता. पोलीस तपास चालू असताना हा तपशील कसा फुटला, याची जोरदार चर्चा चालू आहे. शिंदे यांना राजकीयदृष्ट्या लक्ष्य करण्याचा हा प्रयत्न आहे की काय, असे बोलले जात होते. त्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांचे हे वक्तव्य आले आहे.

फोनवरील संभाषणाचे हे तपशील किंवा कॉल डेटा रेकॉर्ड मिळवण्याचा कोणालाही अधिकार नाही, केवळ अधिकृत यंत्रणाच ते करू शकतात, असे फडणवीस यांनी नाशिकमध्ये पत्रकारांशी बोलताना सांगितले. हा तपशील कसा फुटला याचा तपास करून संबंधित दोषींवर कडक कारवाई केली जाईल असेही ते म्हणाले

संवेदनशील प्रकरणांमध्ये केवळ आरोप पुरेसे नसतात; ठोस पुराव्यांच्या आधारेच कारवाई केली जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

भोंदूबाबा खरातला मार्च महिन्यात अटक करण्यात झाली असून आतापर्यंत त्याच्यावर एकूण आठ गुन्हे दाखल झाले आहेत.



# चित्रपटाचाही बाप असलेला 'ट्विस्ट'! ज्याचे अंत्यसंस्कार झाले, तो ओझुलाल चक्क जिवंत

## मृतदेहाची ओळख पटवून कुटुंबीयांनी केले होते दहन : आता 'तो' मृतदेह नेमका कुणाचा? पोलिसांसमोर मोठे पेच

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड -** तालुक्यातील जळीत हत्याकांडात चित्रपटालाही लाजवेल असा थरारक ट्विस्ट आला आहे.

ज्याचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत आढळला, ज्याच्या वस्तूंवरून पत्नी आणि मुलाने त्याला ओळखले आणि ज्याच्यावर कुटुंबीयांनी अंत्यसंस्कारही केले, तोच व्यक्ती अचानक जिवंत असल्याची माहिती समोर आली आहे. या खळबळजनक खुलाशामुळे खुलाशामुळे पोलिसही चक्रावले असून, 'तो' मृतदेह नेमका कोणाचा? हे शोधण्यासाठी तपासचक्र पुन्हा गतिमान केले आहे.



२९ मार्च रोजी बेसखेडा शिवारातील नाल्यात एक मृतदेह अर्धवट जळालेल्या स्थितीत आढळला होता. पोलिसांनी आरी केलेली शोधपत्रिका पाहून मध्य प्रदेशातील भिलावाडा (जि.बैतुल) येथील ओझुलाल जगरु उईके (४५) यांच्या मुलाने आणि पत्नीने २ एप्रिल रोजी बरुड ठाणे गाठले. पोलिसांनी त्यांच्यासमोर मृताच्या अंगावरील वस्तू ठेवल्या होत्या. याप्रकरणात वरूड पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध खून व पुरावा नष्ट केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

### कुटुंबियांनी केला होता मृतदेहावर दावा

मृताच्या पायातील प्लास्टिकचे बूट, गळ्यातील लाकडी तुळशीची माळ, स्टीलची तंबाखूची इबी, उजव्या हाताच्या बोटातील स्टीलच्या अंगठीपैकी कपड्यांचे अवशेष व अंगठी या वस्तू ओझुलाल यांच्याच असल्याचा ठाम दावा पत्नी आणि मुलाने केला. विशेष म्हणजे, ओझुलाल है दिवाळीपासून घराबाहेर होते आणि ते ६-६ महिने घरी येत नसत, त्यामुळे कुटुंबीयांचा विश्वास अधिक दृढ झाला. ३ एप्रिल रोजी पोलिसांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह उईके कुटुंबाच्या स्वाधीन केला आणि त्यांच्याच उपस्थितीत वरूड येथेच अंत्यसंस्कारही पार पडले.

### तपासाची चक्रे पुन्हा शून्यापासून...

या अजब-गजब ट्विस्टमुळे आता नवीन प्रश्न उपस्थित झाले आहेत. जर ओझुलाल जिवंत आहेत, तर तो मृतदेह कोणाचा होता? ओझुलाल यांच्या अंगावरील वस्तू त्या मृतदेहावर कशा आल्या? की हा केवळ योगायोग आहे? अंत्यसंस्कारापूर्वी पोलिसांनी मृतदेहाचे डीएनए सॅम्पल घेतले होते, जे आता या गुढ उकलण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. वरुड पोलिस आणि स्थानिक गुन्हे शाखेने आता पुन्हा एकदा शून्यापासून तपास सुरू केला असून, या मिस्ट्रीचा छडा लावण्यासाठी पुन्हा पायपीट सरू केली आहे.





